# राज्य निवडणूक आयोग
## महाराष्ट्र

पहिला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

(प्रसिद्धिपत्रक) दि. १४ डिसेंबर २०१६

**पुणे, लातूर जिल्ह्यात नगरपरिषदांसाठी**
**सरसरी ७२.१८ टक्के मतदान**

मुंबई, दि. १४: राज्यातील पुणे व लातूर या दोन जिल्ह्यांमधील १४ नगरपरिषदांच्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आज सरासरी ७२.१८ टक्के मतदान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे.

राज्यात नगरपरिषदा व नगरपंचायतींच्या चार टप्प्यात निवडणुका होत आहेत. दुसऱ्या टप्प्यात आज १४ नगरपरिषदांच्या सदस्यपदाच्या एकूण ३२४; तर थेट नगराध्यक्ष पदांच्या १४ जागांसाठी मतदारांनी मतदान केले. उद्या (ता. १५) सकाळी १० वाजल्यापासून मतमोजणीस सुरवात होईल. निकालानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल.

**प्राथमिक अंदाजानुसार नगरपरिषदनिहाय झालेल्या मतदानाची सरासरी टक्केवारी अशी: पुणे जिल्हा: बारामती-** ७६.५९, **लोणावळा-** ७४.७५, **दौंड-** ६१, **तळेगाव दाभाडे-** ६८.३३, **आळंदी-** ८२.३०, **इंदापूर-** ७७.७२, **जेजुरी-** ८६.१४, **जुन्नर-** ७२.४३, **सासवड-** ७४.७३ व **शिरूर-** ७३.४७. **लातूर: जिल्हा: उदगीर-** ६९.५२, **अहमदपूर-** ६८.९८, **औसा-** ७५.५८ व **निलंगा-** ६७.७१. **एकूण सरासरी-** ७२.१८.

०-०-०

(Jagdish More, SEC, PRO)